# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: २१००१:२०१८) (ISO/IES: २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१००/१५२/१७०

Email: director@msbte.com web: www.msbte.ac.in

जा.क्र.मरातंशिमं/D-५२/Open Electives/२०२५/ 3732 दिनांक:- 2 JUL 2025

प्रति,

मा. कुलसचिव,

महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने बी.ए., बी.कॉम, बी.एसस्सी या पदवी अभ्यासक्रमांत पारंपारीक विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना Open Electives मध्ये पर्याय म्हणुन तांत्रिक विषयांचे पाठयक्रम मंडळाशी संलग्नित पदविका संस्थांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देणेसाठी मंडळाची संलग्नता घेतलेल्या संस्थांची व संबंधीत संस्थेत राबविण्यात येणा-या विषयाबाबतची माहिती.

संदर्भ : मंडळाचे पत्र क्र. मरातंशिमं/D-५१/Open Electives/२०२५/२९८६ दिनांक: २२.०५.२०२५

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने राज्यस्तरीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणीकरिता गठीत सुकाणू समिती व तंत्रशिक्षण कार्यबल गट यांच्या सूचनांनुसार पारंपारिक विद्यापीठांमध्ये बी.ए., बी.कॉम, बी.एसस्सी या पदवी अभ्यासक्रमांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना Open Electives मध्ये पर्याय म्हणुन तांत्रिक विषयांचे पाठयक्रम मंडळाशी संलग्नित संस्थांच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने १३ तांत्रिक विषयांचा पाठ्यक्रम महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत विकसित करण्यात आलेला आहे. सदर विषयांना राज्यस्तरीय शैक्षणिक धोरणाकरिता गठीत सुकाणू समिती, मंडळाची विद्वत समिती, नियामक मंडळ व नियामक परिषद यांची मान्यता प्राप्त आहे. सदरचे तांत्रिक विषय राबविणेकरिता मंडळाची संलग्नता प्राप्त केलेल्या पदविका संस्थांची जिल्हानिहाय यादी संपुर्ण माहितीसह सोबत जोडली आहे ('परिशिष्ट अ').

सदर तांत्रिक विषय राबविणेकरिता संबंधीत संस्थांकडुन आकारण्यात येणारे शैक्षणिक शुल्क, राबविणेकरिताची कार्यपद्धती व इतर माहिती सोबत जोडलेल्या Guideline Document प्रमाणे राहील ('परिशिष्ट ब'). तांत्रिक विषयांसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्का व्यतिरिक्त खालीलप्रमाणे नोंदणी शुल्क व परिक्षा शुल्क लागू राहील.

| | |
|---|---|
| नोंदणी शुल्क | Rs. 150/- |
| नियमित परिक्षा शुल्क | Rs. 200/- |
| विलंब परिक्षा शुल्क | Rs. 200/- + Rs. 100/- |
| अतिविलंब परिक्षा शुल्क | Rs. 200/- + Rs. 300/- |

आपणांस कळविण्यांत येते कि, आपल्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या बी.ए., बी.कॉम, बी.एसस्सी या पदवी संस्थांना सोबत जोडलेल्या तांत्रिक विषय राबविणेकरिताची कार्यपद्धती, शैक्षणिक वेळापत्रक (Academic Calendar), शुल्क व मंडळामार्फत विकसित केलेले तांत्रिक विषयांचे अद्ययावत Teaching Examination Schemes व पाठ्यक्रम याबाबत अवगत करावे. ('परिशिष्ट क').

To Prof. RRD for N.A. 03/07/25

तसेच बी.ए., बी.कॉम, बी.एससी या अभ्यासक्रमाच्या पदवी संस्थांनी त्यांच्या नजिकच्या पदविका संस्थांशी संपर्क साधून, तांत्रिक विषयांकरिता इच्छुक विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करणेसाठी सुचित करावे.

(डॉ. प्रमोद अ. नाईक)
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व कार्यवाहीकरीता:

१) मा. कुलगुरु, सर्व विद्यापीठे यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर .
३) मा. अध्यक्ष, राज्यस्तरीय सुकाणू समिती, यांना माहितीस्तव.

AnyScanner